# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-२०३ दिनांक -२८/०५/२०२४

## मिसिंग इसमाच्या मृत्युचे रहस्य उलगडण्यात, विरार पोलीस ठाणेस यश.

विरार पोलीस ठाणे हद्दीत दि.१४/०४/२०२४ रोजी पासुन इसम नामे.रमेश बालन नायर, वय-४८ वर्षे, रा.साई छाया अपार्टमेंट, सहकार नगर, विरार पुर्व हा घरात कोणास काही एक न सांगता कोठेतरी निघुन गेले बाबत श्रीमती.लिला नायर, वय-७० वर्षे, यांनी दिलेल्या तक्रारी वरुन विरार पोलीस ठाणेत मिसिंग रजि नं.११५/२०२४ अन्वये दि.१८/०४/२०२४ रोजी मनुष्य मिसिंग नोंद करण्यात आली आहे. सदर मनुष्य मिसिंगची चौकशी पोहवा/समाधान चव्हाण, विरार पो.ठाणे हे करत होते. सदर मनुष्य मिसिंग चौकशीमध्ये मिसिंग इसमास इसम नामे. गोविंद खानिया ऊर्फ भुऱ्या याचे सोबत शेवटचे पाहिले असुन, तेव्हा पासुन इसम नामे. गोविंद खानिया ऊर्फ भुऱ्या हा देखील मिळुन येत नसल्याने, त्याचेवर संशय व्यक्त केला होता.

सदर प्रकरणाचे गांभिर्य लक्षात घेवुन, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, यांनी विरार पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्या बाबत आदेश दिले होते. मा.वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे नमुद मिसिंग इसमांचे व संशयीत इसमाची तांत्रिक माहिती गोळा करुन, त्याद्वारे संशयीत इसमाचा शोध घेत असतांना, तो वैतरणा रेल्वे स्टेशन येथे आल्याची माहिती मिळाल्याने, सदर ठिकाणी सापळा रचुन संशयीत इसम- गोविंद खानिया ऊर्फ भुऱ्या, रा.कोपरी, विरार पुर्व यास ताब्यात घेवुन, त्यास विश्वासात घेवुन, त्याचेकडे मिसिंग इसमा बाबत चौकशी केली असता, त्याचेकडून माहिती मिळाली की, मिसिंग इसमाने संशयीत इसमाची प्रेमिका हिची छेड काढुन, तीचेकडे शरीरी सुखाची मागणी करत असल्याने, त्या गोष्टीचा संशयीत इसमास राग आल्याने, त्यास साईनाथ नगर, वैष्णवी मंदिरा जवळील डोंगरावर घेवुन, मिसिंग इसमाचे छातीवर ठोश्याबुक्क्यांनी मारहाण करुन, त्याचे लिंग पिरगळुन त्यस जिवे ठार मारले असल्याचे माहिती दिली. त्याअनुषंगाने पोलीस ठाणेचा अभिलेख तपासला असता, दि.१४/०४/२०२४ रोजी एक बेवारस इसमाचे प्रेत मिळुन आल्याने, त्याबाबत विरार पोलीस ठाणेत अकस्मात मृत्यु रजि.नं.६१/२०२४, सी.आर.पी.सी.१७४ प्रमाणे नोंद असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन आरोपीत नामे. गोविंद खानिया ऊर्फ भुऱ्या, रा.कोपरी, विरार पुर्व याचे विरुध्द सपोनि/संदेश पालांडे, विरार पा.ठाणे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पो.ठाणे गु.रजि.नं. I ३७७/२०२४, भा.दं.वि.सं. कलम- ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री.जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री.बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सपोनि/संदेश पालांडे, पोउपनि/संजय चव्हाण, पोहवा/समाधान चव्हाण, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, पोअं/बालाजी गायकवाड, सर्व नेम.विरार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.

-----ooo-----